सूचना का अधिकार

महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज, जि.सांगली.
Government Medical College, Miraj Dist-Sangli
Tel:0233/2232090-99 Fax:2231959 E-mail:-deangmcmiraj@yahoo.co.in

जा.क्र./शावैमवि/व्ही.आर.डी.एल/कंत्राटीपदे/मुलाखत/ ५९८४/२०२६ दिनांक:- २३.०७.२०२६

# मुलाखत

विषय:- व्ही.आर.डी.एल (VRDL) सुक्ष्मजीवशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज अंतर्गत राबविण्यात येणा-या राष्ट्रीय उपक्रमांसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार कंत्राटी पध्दतीने करारतत्वावर (१२० दिवसांकरिता) पदे भरणेबाबत...

संदर्भ:- १.जा.क्र./शावैमवि/व्ही.आर.डी.एल/कंत्राटीपदे/जाहिरात/५७१३/२०२६ दिनांक:- १०.०७.२०२६
२.जा.क्र./शावैमवि/व्ही.आर.डी.एल/कंत्राटीपदे/पात्र यादी/ ५९८२ /२०२६ दिनांक:- २३.०७.२०२६

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज अंतर्गत सूक्ष्मजीवशास्त्र विभागमधील व्ही. आर. डी. एल. (Virus Research & Diagnostic Laboratory) या प्रयोगशाळे अंतर्गत राबविण्यात येणा-या राष्ट्रीय उपक्रमांसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर (१२० दिवसांकरिता) खाली दिलेल्या तक्त्यानुसार पदासाठी नेमणूक करावयाची असून यासाठी दि.२३.०७.२०२६ रोजी जाहिर केलेल्या पदांच्या पात्र उमेदवारांनी मुलाखतीस येताना सर्व प्रमाणपत्रे व कागदपत्रांची मुळ प्रत (Orignal) घेऊन येणे बंधनकारक आहे. तसेच खाली दिलेल्या पत्त्यावर स्वखर्चाने उपस्थित रहावे. भरावयाच्या पदाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या |
|---|---|---|
| १ | रिसर्च सायंटिस्ट बी (नॉन-मेडिकल) | १ |

**कागदपत्रे तपासणीचे ठिकाण** : व्ही.आर.डी.एल सूक्ष्मजीवशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज

**कागदपत्रे तपासणीचे दिनांक व वेळ** : दिनांक.०७ .०८ .२०२६ दुपारी : ०३.०० वाजता

**मुलाखतीचे ठिकाण** : महाविद्यालयीन परिषद हॉल अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज.

**मुलाखतीची दिनांक व वेळ:** : दि.०७ .०८ .२०२६ दुपारी: ०४.०० वाजता

पुढील पानावर

Scanned with OKEN Scanner

**अटी व शर्ती:**

१) सदरची नियुक्ती हि पुर्णपणे कंत्राटी तत्वावर असलेने नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना शासकीय कर्मचारी यांना मिळणाऱ्या सोई सुविधांचा लाभ मिळणार नाही.

२) नियुक्तीसाठी बाहयशक्तीचा दबाब अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी आपोआप अपात्र ठरतील.

३) करार पद्धतीवरील नियुक्तीसाठी उमेदवारास आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

४) करार पद्धतीवर नियुक्त केलेल्या उमेदवारांच्या कामकाजाचा आढावा विभागप्रमुख व अधिष्ठाता हे नियमितपणे घेतील. आढावा असमाधानकारक असल्यास संबंधित उमेदवाराची नियुक्ती कोणतीही पूर्व सूचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राहतील.

५) करार पद्धतीच्या उमेदवारास विभागाचे प्रमुख व अधिष्ठाता यांच्या नियंत्रणाखाली आपले कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील तसेच या उमेदवारांना नियमित पूर्ण वेळ काम करणे बंधनकारक राहील. सदर पदे ही साथरोग नियंत्रण प्रकल्पांतर्गत असल्याने परिसरात उद्‌भवणाऱ्या साथरोगांच्या उद्रेकांच्या वेळी प्रसंगानुरुप उद्रेकाच्या ठिकाणी जाऊन कामकाज करावे लागेल.

६) करार पद्धतीतीवरील नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी व त्या अनुषंगिक लाभासाठी कोणताही हक्क राहणार नाही.

७) करार पद्धती वरील निवड झालेल्या उमेदवारांनी कामावर रुजू होण्यापूर्वी वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याची लेखी हमी रु.५०० च्या स्टॅप पेपरवर प्रतिज्ञापत्र / करारपत्र नोटरी करुन कामावर रुजू होताना सादर करणे आवश्यक आहे. तसेच पदाच्या नियुक्ती आदेश संदर्भीत घेऊन मा. न्यायालयात कायमस्वरुपी कामावर सामावून घेणे बाबत याचिका दाखल करणार नसल्याबाबत निवड झालेल्या उमेदवाराकडून प्रतिज्ञापत्र (५०० रु.बॉन्ड पेपरवर) लिहून घेण्यात येईल.

८) नियम व अटींच्या अधीन राहून नियुक्ती आदेश देण्यात येतील. उच्च शैक्षणिक धारकास व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

९) उमेदवारास संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. एमएस-सीआयटी किंवा तत्सम संगणक परिक्षा उर्तीर्ण प्रमाणपत्र अपेक्षीत आहे, नसल्यास सदर प्रमाणपत्र नियुक्तीपासुन तीन महिन्यांच्या आत संस्थेत सादर करावे लागेल अन्यथा नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१०) मुलाखतीसाठी प्राप्त झालेल्या अर्जाच्या छाननीत मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांची संख्या जर मोठया प्रमाणात असेल तर उमेदवाराची आवश्यकतेप्रमाणे लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांचीच मुलाखत घेण्यात येईल.

११) निवड समितीचा निर्णय हा अंतिम राहील यासाठी कोणतेही निवेदन/तक्रार विचारात घेतले जाणार नाही.

१२) कोणतीही पूर्वसूचना न देता निवड प्रक्रिया व निकष बदलणेचे किंवा रद्द करणेचे अधिकार निवड समितीने राखून ठेवले आहेत.

डॉ. प्रकाश गुरव
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज

Scanned with OKEN Scanner